# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १८/०३/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूटमार्च

पोलीस स्टेशन कुही अंतर्गत दिनांक १५/०३/२०२४ रोजीचे १८/०० ते १९/४० वा. पर्यंत आगामी लोकसभा निवडणूक व आगामी सण उत्सव संबंधाने कुही शहर व मांढळ शहर येथे रूटमार्च घेण्यात आले असून रूट मार्च मध्ये पोलीस स्टेशन कुही येथील पोलीस निरीक्षक श्री भानुदास पिदुरकर ठाणेदार कुही व ०४ अधिकारी, १२ अंमलदार, १४ होम सैनिक, रेल्वे पोलीसचे ०१ अधिकारी २० कर्मचारी असे एकूण ०६ अधिकारी, ३२ पोलिस अंमलदार व १४ होम सैनिक हजर होते.



## पोस्टे कन्हान हद्दीतील
## अवैधरित्या विदेशी दारुची वाहतुक करणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक १७/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ पो.स्टे. कन्हान परीसरात प्रोव्हीशन रेड कामी पेट्रोलींग करीत असता मौजा तारसा फाटा कन्हान येथे मुखबिरद्वारे खात्रीशीर माहिती मिळाली कि, मौजा कांद्री कडुन एन. एच. ४४ रोडनी एका सी. बी. झेड मोटार सायकल क्र. एम. एच. –३१/ ई.बी.– १०३० वर दोन ईसम एका पांढऱ्या रंगाचा प्लॅस्टीक बोरीमध्ये विदेशी दारु घेवुन कन्हानकडे येत आहे. अशा खात्रीशीर खबरेवरुन सदर इसमांना ताब्यात घेवुन अवैध दारु बाबत नाका नं. ०७ कन्हान येथील एन. एच.–४४ जबलपुर नागपुर रोडवर नाकाबंदी करीत असता दोन ईसम एक काळया रंगाची हिरो होंडा सी. बी. झेड मोटार सायकल क्र. एम. एच. ३१/ई.बी. –१०३० वर एक पांढऱ्या रंगाची प्लॅस्टीक चुंगडी घेवून येतांना दिसल्याने सदर ईसमांना थांबण्याचा ईशारा केला असता त्यांनी आपले वाहन थांबविले त्यांना त्याचे नाव, गाव विचारले असता मोटरसायकल चालकाने आपले नाव **पवन अरुण मेश्राम, वय ३३ वर्षे, रा. संताजी नगर कांद्री कन्हान** व मोटरसायकलवर मागे बसलेला ईसमाने आपले नाव **रामदास किसन मोटघरे, वय ४२ वर्षे, रा. इंदीरा नगर कन्हान** असे सांगितले. सदर ईसमाचे ताब्यातील पांढऱ्या प्लॅस्टीकचे बोरीची पाहणी केली असता बोरीत विविध कंपन्याचे एकुण ६५ निपा विदेशी दारू एकूण १०७००/– रू चा मुद्देमाल व हिरो होन्डा सी. बी. झेड मोसा क्र. एम एच ३१/इ बी–१०३० किंमती २५०००/–रू असा एकूण ३५७००/– रूपयाचा मुद्देमाल मिळून आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, सहायक पोलीस निरीक्षक पराग फुलझेले, सपो.नि. राहुल चव्हाण, पोहवा हरीष सोनभद्रे, सचिन वेळेकर, पोलीस नायक अमोल नागरे, पोना अनिल यादव, चालक पो.हवा. संदीप गेडाम यांनी केली.

## पोलीस स्टेशन रामटेक हद्‌दीतील लोहडोंगळी शिवार येथे अवैध दारू भट्टीवर छापा

## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक १७/०३/२०२४ रोजी पो.स्टे. रामटेक हद्दीत लोहडोंगळी शिवारात मोहाफुल गावठी दारू गाळत असल्याची गोपनीय खबर स्थानिक गुन्हे शाखा येथील स्टाफला मिळाल्याने लोहडोंगळी शिवारात रेड केली असता **आरोपी नामे– मोरेश्वर गुलाब मोहनकर, वय ४४ वर्ष, रा. नगरधन ता. रामटेक** या नावाचा इसम दगड विटाच्या चुलीवर अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची भट्टी तयार करून दारू गाळत असल्याबाबत गोपनिय बातमी मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथील स्टाफने नमुद घटनास्थळी अवैध मोहाफुल दारू भट्टीवर छापा मारून एकुण किंमती ३२,४००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध पोलिस स्टेशन रामटेक येथे कलम ६५(B)(C)(E)(F) म. दा. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन कारवाई दरम्यान १) १०० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ५०००/–रू. २) ५ प्लास्टीक पिशवीमध्ये २०० प्रमाणे १००० लिटर मोहाफल रसायण सडवा किंमती २०,०००/– रू ३) इतर घरगुती २ लोखंडी ड्रम किंमती २०००/– रू ४) इतर कच्चा माल इतर साहित्य किंमती ७४००/– रू एकुण किंमती ३४,४०० –रूपयाचा मुद्‌देमाल जप्त करून मोहाफुल गावठी दारूच्या भट्टया उद्धवस्त करण्यात आल्या आहे. जप्त मुद्‌देमाल पुढील कायदेशिर कारवाईकरीता पोलीस स्टेशन रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पो.हवा रोशन काळे, शंकर मडावी, नितेश पिपरोदे, उमेश फुलबेल, प्रमोद भोयर, पोना विपीन गायधने, विरेंद्र नरड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर